स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

सामाजिकशास्त्र विद्याशाखा अंन्तर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता

सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा.

* संशोधन विषय *

"नागरी भागातील बालकामगारांच्या समस्या :- एक समाजशास्त्रीय अध्ययन"
(विशेष संदर्भ : बीड जिल्हा)

* संशोधक विद्यार्थी *

प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव

समाजशास्त्र विभागप्रमुख (पदवी व पदव्युत्तर विभाग)

स्वामी रामानंद तीर्थ माहविद्यालय, अंबाजोगाई

ता. अंबाजोगाई जि. बीड - ४३१५१७

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ. एस. पी. गायकवाड

समाजशास्त्र विभागप्रमुख

दयानंद कला महाविद्यालय,

लातुर जि. लातुर

वर्ष : ऑगस्ट २०१६

''नागरी भागातील बालकामगारांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन''

(विशेष संदर्भ : बीड जिल्हा)

प्रस्तावना :

बालकामगार ही संपूर्ण विश्वाला भेडसावणारी समस्या आहे. बालविकासाच्या प्रश्नाशी निगडीत असलेली एक गंभीर समस्या म्हणून बालकामगार या समस्येचा उल्लेख करता येईल. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी लहान मुलांना शारिरीक श्रमाची कामे करावी लागणे हा सभ्य समाजावरील फार मोठा कलंक आहे. विकसित राष्ट्रामध्ये बालकामगार या समस्येने उग्र रुप धारण केले आहे. भारतात १२ जून हा बालकामगार दीन म्हणून ओळखला जातो. दरवर्षीच आपण १४ नोंव्हेबर हा दीवस स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या स्मृती दिनानिमित्त बालदिन म्हणून साजरा करतोत. केवळ आपल्या राष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण विश्वात बालपण गमावून बसलेली कोट्यावधी मुले आहेत. बालकामगार हा जरी जागतीक प्रश्न बनला असला तरी, अविकसीत आणि विकसनशील समाजव्यवस्थेमध्ये ज्या अनेक कुप्रथा आणि परंपरा अनादी काळापासून चालत आलेल्या आहेत, त्यांच्या निर्मुलनासाठी शासनामार्फत, समाजसेवी संस्थामार्फत अनेक प्रकारच्या उपाय योजना, विविध घटनात्मक तरतुदी करुनही त्या संपूष्टात आलेल्या नाहीत.

मनुष्याच्या आयुष्यातील बालपण ही अत्यंत आनंददायी अवस्था समजली जाते. म्हणूनच रम्य ते बालपण असे या अवस्थेसंबधी म्हटले जाते. बालपणाच्या सुखद आठवणी जाग्या झाल्यावर बालपण दे गा देवा अशी ईश्वराकडे मागणी मागण्याचा मोह मोठ्या मोठ्या व्यक्तींनाही होणे स्वाभाविक असते. बालपणीचे दिवस हे खेळण्याचे - बागडण्याचे, मौज-मस्ती करण्याचे व जीवनाचा आनंद लुटण्याचे दिवस समजले जातात; परंतू काही दुर्दैवी मुलांच्या नशिबी मात्र बालपणीच्या दिवसाचा आनंद घेण्याऐवजी पोटासाठी काबाडकष्ट करण्याचेच आलेले असते. त्यातुनच बालकामगाराची समस्या निर्माण होते. शासकीय व निमशासकीय पातळीवरुन आजतागायत बालकामगारांच्या मानवी हक्कांची होणारी पिळवणूक थांबलेली नाही. चिमुकल्या व निरागस बालकांचा स्वतःच्या स्वार्थासाठी, नफा प्राप्तीसाठी गैर वापर करणे हे अत्यंत घृणास्पद राक्षसीकृत्य असून हे मानवी हृदयाला वेदना पोहचवणारे आहे. बालगामगार म्हटला की, आपल्या डोळ्यासमोर लहान बालकांची प्रतिमा उभी राहते. वयाने अत्यंत लहान, अशक्त, नाजूक, कुपोषणग्रस्त, निरक्षर, शारीरिक मेहनत घेणारा, दारिद्र्य अंगावरुन दिसून येणारा. ई. जे वय आई-वडील, गरु यांच्या संस्कारात वाढण्याचे आहे, त्याच वयात यांना अंगमेहनतीची, हाल अपेष्टांची कामे करावी लागतात.

भारतीय समाजातील दुर्बल घटकामध्ये बालकामगारांचा समावेश होतो. अशिया, दक्षिण आफ्रिका खंडातील देशामध्ये बालकामगारांची तीव्रता जास्त आहे. काही बालकामगार हे परिस्थितीमुळे काम करतात तर काही बालकामगार हे जबरदस्ती जूलूम अत्याचारामुळे काम करतात. आपल्या व कुटूंबाच्या उदर-निर्वाहासाठी तसेच दैनंदिन जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठीच बालकामगार काम करतात. अनेक वेळा ते काम उत्पादक किंवा अनुत्पादक परंतू मानवी जीवनाच्या आवश्यकतांची पूर्ती करणरे असेल. कोणत्याही व्यक्तीचा शरिरीक, मानसिक, भावनिक, बौध्दिक विकास झाल्यानंतर श्रम करणे गरजेचे असते. परंतू ज्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक विकास झाला नाही, त्याच बरोबर समाजिक जीवनातील सहभाग हा मार्यादीत आहे, अशा लहान बालकांना कष्टाची कामे करावी लागतात.

भारत सरकारने बालकांना ५४ प्रकारचे अधिकार दिले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या सभेत भारत सरकारने तसे मान्य केले आहेत. या अधिकारात मुलांना जगण्याचा अधिकार, सहभागीतेचा अधिकार, विकासाचा अधिकार, आरोग्याचा, शिक्षणाचा अधिकार तसेच संरक्षणाचा अधिकार इ. अधिकारांचा समावेश केला आहे. बालमजुरीला आळा घालणं ही फक्त भारत सरकारचीच जबाबदारी नसुन प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. वर्ष १९७९ मध्ये भारत सरकाने बालकामगारांची समस्या आणि त्यावर उपाय शोधण्यासाठी 'गुरुपाद स्वामी समिती' स्थापन केली. या समितीने समस्येचे सखोल व विस्तारपूर्ण अध्ययन करुन आपल्या उपाययोजना प्रस्तुत केल्या या समीतीने असा निष्कर्ष काढला की, भारतातील जोपर्यंत दारीद्र्याचे निर्मुलन होणार नाही तोपर्यंत बालकामगार या समस्येवर नियंत्रण करणे अशक्य आहे. तसेच या समितीने असा अहवाल दिला की, धोकादायक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बालकामगारावर प्रतिबंध लावला जावा.

गुरुपाद स्वामी समितीच्या सिफारशींचा आधार घेवून बालमजुरी प्रतिबंधक आणि विनिमयन कायदा - १९८६ लागू करण्यात आला.

- **बालकामगारांच्या संदर्भात २०११ च्या जनगणना अंतिम अहवालानुसार सांख्यिकीय माहिती : -**
  भारतीय जनगणनेनुसार बालकामगारांची (वयोगट ५ ते १४) ३५ राज्यांमधील एकूण संख्या हि ४३,५३,२४७ ऐवढी आहे. २००१ च्या जनगणनेनुसार हि संख्या १,२६,६६,३७७ एवढी होती. महाराष्ट्र राज्यातील बालकामगारांची संख्या ४,९६,९१६ एवढी आहे. तर २००१ च्या जनगणेनुसार ७,६४,०७५ होती.

  २०११ च्या जनगणना अंतिम अहवालामध्ये ५ ते ९, १० ते १४ आणि १५ ते १९ या वयोगटातील बालकामगारांची आकडेवारी नमूद केलेली आहे. जनगणना २०११ च्या नुकत्याच प्रसिध्द झालेल्या अंतिम अहवालानुसार ५ ते १८ या वयोगटातील ११ वे बालक कामगार आहे. याचाच अर्थ कामगार

लोकसंख्योतील ६% लोकसंख्या ५ ते १८ वयोगाटातील आहेत. देशातील उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, राज्यस्थान आणि मध्यप्रदेश या ५ राज्यांमध्ये बालकामगारांच्या एकूण संख्येपैकी निम्मे बालकामगार आहेत.

अनु. क्र	वयोगट	पुरुष/मुले	स्त्रिया/मुली	एकूण
१	५ ते ९	६,३०,८७५	४,७७,९३३	११,०८,८०८
२	१० ते १४	२०,३३,१७२	११,११,२६७	३२,४४,४३९
३	१५ ते १९	१,२७,२१,८९१	४९,८१,४१९	१,७७,०३,३१०
	एकूण	१,५३,८५,९३८	६६,७०,६१९	२,२०,५६,५५७
एकूण बालकामगारांचे प्रमाण %		८.६४%	९.८४%	८.९७%

बीड जिल्हा थोडक्यात माहिती :-

बीड जिल्हा केंद्र सरकारच्या श्रममंत्रालयाच्या योजने अंतर्गत बीड जिल्ह्यात राष्ट्रिय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षेखाली समिती गठीत करण्यात आली व १२ फेब्रुवारी १९९७ ला समितीची नोंद केली. या समितीने बीड जिल्हातील बालकामगारांचे सर्वेक्षण केले त्यानुसार ९ ते १४ वयोगटातील १४११ मुले व ७८९ मुली असे एकूण २१५० बालकामगार आढळून आले. ०६ ते १४ वयोगटातील एकूण बालकामगार २२,०९६ एवढे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यात ३.९% बालकामगार आहेत. बीड जिल्ह्याची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २५,८५,०४९ एवढी आहे त्यापैकी १३,४९,१०६ पुरुष आहेत तर १२,३५,९४३ महिला आहेत. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी २.२३% लोकसंख्या बीड जिल्ह्यात वास्तव्य करते. ग्रामिण भागातील लोकसंख्या ८०.१०% एवढी आहे तर नागरी भागातील लोकसंख्या १९.९०% आहे. म्हणजेच ५,१४,२९८ लोकसंख्या नागरी भागात राहते. चाईल्ड सेक्स रेशो हा ग्रामीण भागातील ७९६ तर शहरी भागातील ८५४ आहे. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ आहे.

बालकामगार व्याख्या व अर्थ :-

१. **एम.एस. गुरुपादस्वामी समिती (१९७९) :-** "बालकामगार म्हणजे संबंधित बालकाला त्याच्या शारीरिक कुवतीपेक्षा अधिक काम करावे लागणे, कामाच्या तासांमुळे त्याच्या शिक्षण, पुनःनिर्मिती क्षमता आणि आराम यांना बाधा येणे, केलेले काम आणि मिळालेला मोबदला यात व्यस्त प्रमाण असणे आणि कामाच्या स्वरुपामुळे त्याच्या जीवित आणि आरोग्याला धोका असणे म्हणजेच त्याचे शोषण होय."

२. **आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) :-**

"बालकामगार म्हणजे ज्या बालकांवर बालपणीच प्रौढत्व लादले जाते व अत्यंत कमी वेतनावर दिवसभर त्यांच्या शारीरीक व मानसिक विकासास बाधक ठरेल अशा परिस्थितीत काम करावे लागते."

३. **युनायटेड स्टेटस डिपार्टमेंट ऑफ लेबर : -**

"बालकामगार म्हणजे अशी मुले व मुली ज्यांना त्यांच्या अल्पवयाचा विचार न करता अयोग्य व असुरक्षित असे काम करावे लागते व बलकांच्या कल्याणाच्या दृष्टीने कामाच्या ठिकाणची परिस्थिती अत्यंत घातक स्वरूपाची असते."

४. **होमर फिक्स :-**

"मुलांच्या पुर्ण शारिरीक विकासात त्यांच्या किमान अपेक्षित शिक्षण घेण्याच्या संधीत किंवा त्यांना आवश्यक असलेल्या मनोरंजनाच्या कामात अडसर निर्माण करणारे कोणतेही काम मुले करीत असतील तर त्यांना बालकामगार असे म्हणतात."

बालमजुरी संदर्भात भारतीय राज्यघटनात्मक तरतुदी :

भारतीय राज्यघटनेत (२६ जाने १९५०) वेगवेगळ्या मुद्यात मुलांसाठी सर्व साधारण हक्क व राज्याचे वेगवेगळे मनसुबे खालील प्रमाणे :-

१. महिला व बालकासंबंधी विशेष पावले उचलताना राज्यांना कोणीही रोखणार नाही. (कलम नं.१५)

२. शिक्षण हा ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाचा मुलभूत अधिकार आहे. (कलम नं. २१ अ)

३. जबरदस्तीने काम करुन घेणे आणि मनुष्य व्यापार करण्यास बंदी घालण्यात आली आहे. (कलम नं. २३)

४. १४ वर्षाखालील कोणत्याही मुलांना कारखान्यात किंवा खाणीत जेथे त्यांच्या जिवाला धोका आहे. अशा ठिकाणी नौकरीस ठेवता येणार नाही (कलम नं. २४)

५. राज्याचे मनसुबे कामगारांच्या, स्त्री, पुरुष, युवा वा मुलांच्या आरोग्यासाठी आहेत आणि त्यांना बळजबरीने ह्या कामात जे त्यांच्या ताकतीच्या बाहेरील व वयाला न शोभणारे असेल करायला भाग पाडता कामा नये. (कलम नं.३९ इ.)

६. मुलांना चांगल्या योग्य वाढीसाठी चांगले वातावरण व गरजा मिळणे जरुरी आहे आणि स्वतंत्र जगण्याचे हक्क व सोयी ज्याने त्यांचे आत्मरक्षण होऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल. (कलम नं.३९ फ)

७. राज्याने १० वर्षात घटनेप्रमाणे मुलांच्या १४ वर्षापर्यंत त्यांनी स्वतंत्र व सक्तीचे शिक्षण घेण्यासाठी प्रत्यन केला पाहिजे. (कलम नं.४५)

८. केंद्र सरकार व राज्य सरकाने एकत्र येऊन बालमजुरीच्या मुद्यावर विचार करणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या प्रकारे कायदेशीर पुढाकार दोन्ही पातळीवर घेतले गेले पाहिजेत. काही खास सरकारी विकासाचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

९. बालमजुरी कायदा व १९८६ थोपवणूक व सक्ती हा कायदा १४ वया खालील मुलांच्या काम करण्यावर बंदी घालतो. तरुण वयाच्या १५ ते १८ वर्षाच्या मुलांना काम करण्यासाठी कारखान्यात त्यांच्या जीवाला धोका नसल्याची जर डॉक्टरने परवानगी दिली तर बंदी नाही.

१४ ते १८ वयोगटातील मुलांना फक्त सोडेचार तास काम करता येईल व त्यांना रात्रपाळी देऊ नये असे ही या कायद्यात नमुद केले आहे.

पुर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा :-

बालकामागार याच विषयाच्या अनुषंगाने पुर्वी झालेल्या संशोधन कार्याचा अभ्यास केला जाईल. तसेच विषयाशी सुसंगत उपलब्ध संदर्भाचा अभ्यास केला जाईल. या आधारे गृहीतकृत्यांची तपासणी करुन सत्यते बाबत खात्री केली जाईल. या संशोधनासाठी एम.फिल व पीएच.डी साठी करण्यात आलेले व प्रस्तूत विषयाषी निगडीत असलेल्या संशोधनाचा अभ्यास केला जाईल.

संशोधन विषयाची गरज व महत्त्व :-

बालकामगार ही जागतिक स्वरुपाची समस्या आहे. १८ व्या शतकात इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिक क्रांती नंतर उत्पादन क्षमता प्रचंड प्रमाणावर वाढली एकाच प्रकारचे उत्पादन अनेक उत्पादक करु लागले. ज्या उत्पादकाची किंमत कमी त्यांच्या उत्पादानाचा खप, उत्पन्न व नफा वाढू लागला उत्पादनाची किंमत कमी ठेवण्यासाठी उत्पादक वेगवेगळे प्रयोग करु लागले. या प्रयोगात एक महत्त्वाचा प्रयोग म्हणजे बालकामगारांना अत्यंत कमी मोबदला दिला तरी चालत असे. बऱ्याच वेळा

त्यांच्या भोजनाची व कपड्यांची व्यवस्था करुनही उत्पादक मुलांना खाणे - पिण्याच्या सोयी उपलब्ध करुन देणे अवघडअसल्याने पालकांनाही मुलांना पाठवून त्यांच्या उपजिवीकेची सोय विचारात घेतली. यातूनच पूढे बालकामगार समस्या उग्र रुप धारण करत गेली. यातुनच बलकांचा जगण्याचा, आरोग्याचा, शिक्षणाचा, संरक्षणाचा, सहभागीतेचा, खेळण्याचा, मनोरंजनाचा इ. हक्क हिसकावून घेण्यात आले. बालकांच्या हक्कांचे धिंडवडे काढण्यात आले, मानवी हक्क पायदळी तुडविल्या गेले.

प्रस्तुत शोध प्रबंधात बालकामगारांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. बालकामगार हा दुर्बल व वंचित घटक असल्यामुळे या बालकामगारांना शिक्षण, आरोग्य, आहार, मनोरंजन मिळवून देण्यासाठी संशोधकाकडून प्रामाणिक प्रयत्न केला जाईल. प्रस्तुत शोध प्रबंध हा समाज कल्याणासाठी उपयोगी पडेल यांची संशोधक खात्री बाळगतो. कोणतेही संशोधन हे समाज कल्याणासाठी व समाजहितासाठीच असले पाहिजे. अनेक ठिकाणी बालकामगार बिकट परिस्थितीमुळे तर अनेक ठिकाणी पिळवणुकीमुळे काम करतात. अशी मुले शिक्षणा पासुन वंचीत राहतात. शिक्षणापासून वंचित म्हणजे सर्वांगिण विकासापासुन वंचित राहणे होय. शिक्षणापासुन वंचित होणारा बालक स्पर्धेत कसा टिकून राहील. याचा गांभीर्याने विचार करण्याची आज आवश्यकता आहे. तसेच बालकामगारांची आरोग्याची स्थीतीही भयावह आहे. अशी बालके पोषक व सकस आहारापासून वंचित राहतात. बालक हे कोणत्याही राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. जर हे बालकच कुपोषित, रोगीट, दुबळे आणि आरोग्य ग्रस्त असतील तर राष्ट्राचा कोणताही विकास साधता येणार नाही यांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. बाल मजुरीला आळा घालणे ही फक्त भारत सरकाची जबाबदारी नसुन आपल्या सगळ्यांचीच जबाबदारी आहे. प्रस्तुत शोध प्रबंधातून बालमजुरीला आळा बसेल यांचा गांभीर्याने विचार केला जाईल आणि समाज कल्याण कसे साधले जाईल याचा प्रयत्न संशोधक करेल.

* संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१. नागरी भागातील बलकामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.

२. नागरी भागातील बालकामगारांच्या शैक्षणिक समस्या जाणून घेणे.

३.नागरी भागातील बालकामगारांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

४. नागरी भागतील बालकामगार कायद्यांची व त्यांच्यासाठी असणाऱ्या योजनांची माहिती घेणे.

*** गृहीतकृत्ये :-**

१. नागरी भागातील बालकामगारांच्या समस्येसाठी दारीद्रय हे प्रमुख कारण आहे.

२. नागरी भागातील बालकामगारांचे शैक्षणिक मागासलेपण दिसून येते.

३. नागरी भागातील बालकामगारांची सामाजिक स्थीती अत्यंत दयनीय आहे.

४. नागरी भागातील बालकामगार कायद्यांची व योजनांची योग्य अमंलबजावणी होत नाही.

संशोधन विषयाची व्याप्ती व मार्यादा :-

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने बीड जिल्ह्याची निवड केली आहे. त्यामुळे संशोधकाचे कार्य हे बीड जिल्ह्या पुरतेच मर्यादित असेल. संशोधकाने बीड जिल्ह्यातील ११ तालुके अध्ययन सर्वेक्षणासाठी घेतलेली आहेत. बालकामगार समस्या ही विश्वव्यापी स्वरूपाची असली तरीही संशोधकाचे अध्ययन बीड जिल्ह्यापुरतेच मर्यादीत राहील. त्यासाठी संशोधकाने नागरी भागामध्ये काम करणाऱ्या ३०० बालकामगारांची निवड केली आहे. हे अध्ययन कार्य संशोधकास उपलब्ध होणाऱ्या प्राथमिक आणि द्वितीयक साधनांच्या मर्यादेत असणारे आहे. संशोधन कार्य अधिकाधिक वस्तुनिष्ठ व प्रमाणशीर होण्यासाठी योग्य असे नमुने निवडले जातील. निवडलेल्या नमुन्यांच्या मुलाखत अनुसुचीच्या अध्ययनावरच निष्कर्ष अवलंबून असतील. त्यातून समग्राची व्यापकता येणार नाही ही मर्यादा संशोधनाची असेल. प्रस्तुत संशोधनातून नागरी भागामध्ये कामकरणाऱ्या बालकामगारांच्या समस्यांचे अध्ययन करून निष्कर्ष काढले जातील. त्यामुळे हे निष्कर्ष सर्वच क्षेत्रातील बालकामगारांना लागू होतीलच असे मात्र निश्चित सांगता येत नाही. संशोधनाची ही मर्यादा नोंदवून ठेवणे आवश्यक ठरेल.

संशोधनाची साधने, संशोधन पद्धती व नमुना निवड :

अ) संशोधन साधने/ तथ्यसंकलन पध्दती :

प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीतील मुलाखत अनुसूची या प्राथमिक स्त्रोताचा वापर करण्यात येईल.

द्वितीयक किंवा प्रलेखीय स्त्रोत :-

द्वितीयक स्त्रोतामधील सार्वजनिक प्रलेखीय विधिचा वापर करण्यात येईल. यात प्रकाशित आणि अप्रकाशित अहवाल, आंतरराष्ट्रीय अहवाल, आयोग, परिषद व समितीचे अहवाल, संशोधन संस्थाचे अहवाल, शासकीय गॅजेटियर्स, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय रेकॉर्ड, दुर्मिळ प्रलेख, संशोधन अहवाल इत्यादींचा संशोधकाकडून उपयोग केला जाईल.

नमुना निवड पध्दती :-

१. **संभाव्यता नमुना निवड पद्धती :** बाल कामगांराची सामजिक, आर्थिक व शैक्षणिक समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यास्तव बीड जिल्हातील नागरी भागातील ३०० एककांची निवड प्रातिनिधीक स्वरुपात साधा यादृच्छिक नमुन्याद्वारे करण्यात येईल. या निवडलेल्या ३०० एककांकडून मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती भरुन घेण्यात येईल. बीड जिल्हातील ११ तालुक्यामधून ३०० एकक निवडले जातील.

२. **संकलीत तथ्यांचे विश्लेषण :-**

संकलीत केलेल्या तथ्यांच्या विश्लेषणासाठी सांख्यिकीय विश्लेषणाचा अवलंब करण्यात येईल. सांकेतिकरण, वर्गीकरण, सारणीकरण इत्यादींचा आधार घेऊन तथ्यांचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढले जातील.

संशोधनाचा सैध्दांतीक दृष्टिकोण :-

प्रस्तुत संशोधन हे कार्ल मार्क्स या विचारवंताच्या मार्क्सवादी दृष्टीकोणातून केले जाईल. कार्ल मार्क्सने त्याचा सुप्रसिध्द ग्रंथ 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' (साम्यवादी घोषणापत्र) यात एका लेखा द्वारे 'कारखान्यामधून कामकरणाऱ्या बाल श्रमिकांचा त्याग' यातून बाल प्रश्न उपस्थित केले. बालकांचे कामामुळे बालपण हिरावून जाते. असे बालक मार्क्सच्या मते कुटूंबापासून, शिक्षणापासून, खेळ, मनोरंजन, आनंद आणि समाधानापासून, कामापासून परात्म होतात. यामुळे असे बालक निराश व उदासिन जीवन जगतात.

*** संशोधन अहवाल व मांडणी :-**

प्रकरण पहिले :-

प्रस्तावना :

बालकामगार संकल्पना व इतिहास, नागरी भागातील बालकामगार समस्यांचे स्वरूप, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, साहित्य सर्वेक्षण, बलकामगार या समस्ये विषयी पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात येईल. तसेच बीड जिल्ह्याची ऐतिहासीक माहिती यात असेल.

प्रकरण दुसरे :-

- **संशोधन पद्धती :**

प्रकरण दुसरे हे संशोधन पद्धतीवर आधारीत असेल, या प्रकरणात तथ्य संकलनासाठी उपयोगात आणलेली साधने, तथ्यांचे स्रोत, नमुना निवड पद्धती संशोधन आराखडा निवडण्यात येईल, संकलीत तथ्याचे वर्गीकरण या संदर्भात अध्ययन करण्यात येईल. समस्यासुत्रण व प्रस्तुत संशोधनातील सैध्दांतीक दृष्टिकोणाचे अध्ययन केले जाते.

प्रकरण तिसरे :-

- **नागरी भागातील बालकामगारांचे आर्थिक जीवन व समस्या.**

प्रकरण चौथे :-

- **नागरी भागातील बालकामगारांचे शैक्षणिक जीवन व समस्या.**

प्रकरण पाचवे :

- **नागरी भागातील बालकामगारांचे सामाजिक जीवन व समस्या.**

प्रकरण सहावे :

- **नागरी भागातील बालकामगार संदर्भातील कायदे.**

प्रकरण सातवे :

- **निष्कर्ष व उपाययोजना/शिफारशी**

प्रस्तुत सातव्या व अंतीम प्रकरणामध्ये संशोधन अध्ययनावरून वस्तुनिष्ठ आणि तार्कीक निष्कर्ष काढले जातील. या प्रकरणात नवीन काही शिफारशी व उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला जाईल.

संदर्भ सुची तथा परिशिष्ट्ये :-

संदर्भ पुस्तके - मराठी

१) ‘बालक हक्क - प्राचार्या लीला पाटील, ग्रंथाली प्रकाशन, दादर मुंबई.

२) ‘सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण’ डॉ. शरदचंद्र गोखले, व्हिनस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९८७

३) ‘श्रम अर्थ शास्त्र’ डॉ. फडवणीस मृणालिनी डॉ. देशपांडे, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर प्रथम आवृत्ती जुलै २००२

४) ‘भारताचे संविधान’ शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाग तीन मिलींद प्रकाशन वर्धा , आवृत्ती २००७.

५) ‘कामगार कायदे ’: मलाकांचा मार्गदर्शक, एस.आर. सामंत, मुंबई आवृत्ती सातवी २००७.

६) ‘भारतीय सामाजिक समस्या’ - डॉ. भा. की. खडसे श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर आवृत्ती १९९५

७) आपले हक्क आणि त्यांची अमंलबजावणी, डॉ. डी. एन. तळेकर प्राची प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९९७

८) जगातील मुलांची स्थिती युनिसेफ, २००२

९) मुलासांठी सुयोग्य जग जहिरनामा युनिसेफ,२००२

१०) लेख- ‘बालकामगार प्रथा निमुर्लन व प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न’ श्रीनिवास कुलकर्णी.

११) बालमजुरी निमुर्लन राज्यकृती आराखडा महाराष्ट्र शासन २००७

१२) संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे - डॉ. आगलावे प्रदिप

१३) शास्त्रीय संशोधन पद्धती - डॉ.बी.एम.कऱ्हाडे.

संदर्भ पुस्तके इंग्रजी :-

1) 'Dimesions of Child labour in India'

K.K. Mishara. Ashish publishing House, New delhi, 1991

2) 'Child labour in India.' - Mustafa Mohd. Deep & Deep Publishing, new delhi – 1996

3) 'Child labour in Unorganized sector' - Mukta Mittal, Amol publications. Pvt. Ltd. New Delhi - 1994

4) 'Rehabilitation of child labours in indian' – pathi R.N. Ashish publishing house, new Delhi- 1991

5) child labour in india, Nazir Ahmad Shah, Anmol publishing new Delhi- 1992

6) 'Child labour in india' Lakshmidhar Mishra, Oxford university press, New Delhi - 1998.

ब) परिशिष्ट्ये :-

१) परिशिष्टामधून तथ्य संकलनासाठी वापरलेल्या प्राथमिक स्त्रोतांची साधने नमुना स्वरुपात दिली जातील.

उदा. प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची , सर्वेक्षण प्रपत्र इ.

*** संशोधक विद्यार्थी ***

प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव

समाजशास्त्र विभागप्रमुख (पदवी व पदव्युत्तर विभाग)

स्वामी रामानंद तीर्थ माहविद्यालय, अंबाजोगाई

ता. अंबाजोगाई जि. बीड - ४३१५१७

*** मार्गदर्शक ***

प्रा. डॉ. एस. पी. गायकवाड

समाजशास्त्र विभागप्रमुख

दयानंद कला महाविद्यालय,

लातुर जि. लातुर